CMYK

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## दुधनाळ बसस्थानकावर मंगळसूत्रांची चोरी; सव्वा लाखांचा ऐवज लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ जून -**

दुधनाळ बसस्थानक परिसरात गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने चार महिलांची मंगळसूत्रे चोरून नेल्याची घटना मंगळवारी (दि. २ जून) घडली. या प्रकरणात एकूण १ लाख ४५ हजार रुपयांचा ऐवज लंपास झाला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शांताबाई धनराज सोमवंशी (वय ८०, रा. नारंगवाडी, ता. उमरगा), कविता गुळगे (रा. दुधनाळ), सुनंदा सोनटक्के (रा. बेंबळी) आणि उज्वला गावडे (रा. पाचगाव, ता. करवीर, जि. कोल्हापूर) या महिलांची सुमारे २९ ग्रॅम वजनाची मनी मंगळसूत्रे अज्ञात व्यक्तीने गर्दीचा फायदा घेऊन चोरून नेली.



याप्रकरणी शांताबाई सोमवंशी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून उमरगा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अन्वये अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.



# विधान परिषद निवडणुकीत बसवराज पाटील विरुद्ध महेश देशमुख यांच्यात थेट सामना

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ जून -**

धाराशिव-लातूर-बीड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली असून महायुतीचे उमेदवार तथा म ाजी मंत्री बसवराज पाटील आणि महाविकास आघाडीचे उमेदवार महेश देशमुख यांच्यात थेट लढतीचे चित्र जवळपास स्पष्ट झाले आहे. मात्र, अपक्ष आणि इतर इच्छुक उमेदवारांनीही अर्ज दाखल केल्याने अर्ज माघारीच्या अंतिम मुदतीपर्यंत राजकीय घडामोडींना वेग येण्याची शक्यता आहे.

उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी बसवराज पाटील यांनी समर्थकांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल केला. तर महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार महेश देशमुख यांनीही प्रमुख नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसमवेत आपला उम `दवारी अर्ज सादर केला.

विशेष म्हणजे, बसवराज पाटील यांच्या उमेदवारी अर्ज दाखल कार्यक्रम ात शिवसेना (शिंदे गट) मधील काही प्रमुख नेत्यांची अनुपस्थिती चर्चेचा विषय ठरली.

### ▶▶ ९ उमेदवारांचे १४ अर्ज दाखल; अर्ज माघारीनंतर अंतिम चित्र स्पष्ट होणार

त्यामुळे महायुतीत सर्व काही आलबेल नसल्याच्या चर्चांना राजकीय वर्तुळात उधाण आले आहे. या घडामोडींचा निवडणुकीवर काही परिणाम होतो का, याकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे.

या निवडणुकीसाठी एकूण ९ उम `दवारांनी १४ उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

प्रमुख उमेदवारांव्यतिरिक्त राजाभाऊ पवार, संजय मुंदडा, अर्चना विनोद गंगणे, अहमदखान सय्यद, शरद यादव आणि मिलिंद महालिंगे यांनीही उम `दवारी अर्ज भरले आहेत.

आता अर्ज छाननी आणि म ाघारीच्या प्रक्रियेनंतर किती उमेदवार प्रत्यक्ष निवडणुकीच्या रिंगणात राहतात, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. प्रमुख पक्षांकडून अपक्ष व बंडखोर उमेदवारांना माघार घेण्यासाठी प्रयत्न सुरू होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

मतदारसंघातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सदस्यसंख्येच्या आधारे महायुती आणि महाविकास आघाडी दोन्ही बाजूंनी विजयाचे दावे केले जात आहेत. महायुतीच्या दाव्यानुसार भाजपचे ३४८, शिवसेना (शिंदे गट) चे ८८ आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे १९९ सदस्य त्यांच्या बाजूने आहेत.

तर महाविकास आघाडीच्या दाव्यानुसार शिवसेना (ठाकरे गट) चे ४०, काँग्रेसचे १५४ आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे ४४ सदस्य त्यांच्यासोबत आहेत. याशिवाय काही सदस्य अपक्ष स्वरूपात असल्याने त्यांची भूमिकाही निर्णायक ठरू शकते.

स्थानिक स्वराज्य संस्थांमधील संख्याबळामुळे महायुतीचे पारडे तुलनेने जड मानले जात असले तरी महाविकास आघाडीनेही ही निवडणूक प्रतिष्ठेची केली आहे. त्यामुळे पुढील काही दिवसांत राजकीय हालचालींना वेग येणार असून अर्ज माघारीनंतर अंतिम लढतीचे चित्र अधिक स्पष्ट होणार आहे.

विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर धाराशिव, लातूर आणि बीड जिल्ह्यांतील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेसकडून विविध जनहिताच्या प्रश्नांवर तहसीलदारांना निवेदन

### महागाई, बेरोजगारी, डिझेल दरवाढ व मतदार यादीतील त्रुटींबाबत प्रशासनाचे लक्ष...



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.३ जून -**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) धाराशिव जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्या तालुकानिहाय जिल्हा दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर परंडा तहसील कार्यालयात विविध लोकहिताच्या प्रश्नांबाबत तहसीलदारांना निवेदन सादर करण्यात आले.

यावेळी महागाई, वाढती बेरोजगारी, डिझेल दरवाढ, पेपरफुटीच्या घटना तसेच विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (एसआयआर) आणि मतदार यादीतील त्रुटी यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले.

नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांची तात्काळ दखल घेऊन प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम करणाऱ्या प्रश्नांबाबत प्रशासनाने गांभीर्याने विचार करून आवश्यक कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच मतदार यादीतील त्रुटी दूर करून पात्र नागरिकांना मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहावे लागू नये, यासाठी विशेष प्रयत्न करण्याची मागणी करण्यात आली.

या प्रसंगी तालुकाध्यक्ष किरण कराळे, जिल्हा सचिव सुवास ठोंगे, शहराध्यक्ष शहाबर्फीवाले सर, युवक तालुका अध्यक्ष प्रवीण गरड, शिवाजी गायकवाड, जिल्हा संघटक अमोल सुरवसे, दशरथ चाबुकसवर, सज्जन गोडगे, कुंभार साहेब, माजी सैनिक हनुमंत चव्हाण, अब्दुल पटेल, कल्याणराव थिटे, मारुती कांबळे, दादासाहेब केमदारने, महावीर महाराज, ऋषिकेश पाटील, अनिल नाईकवाडी यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धाराशिवमध्ये दोघांकडून विनापरवाना कोयता जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ जून -**

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा प्रकारे विनापरवाना लोखंडी कोयता बाळगणाऱ्या दोन युवकांविरुद्ध धाराशिव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दत्ता भानुदास काळे (वय २१) व अर्जुन संजय पवार (वय २१, दोघेही रा. पापनास नगर पारधी पिडी, धाराशिव) हे मंगळवारी (दि. २ जून) रात्री सुमारे १.४५ वाजता भन्साळी मेडिकलसमोर, छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे विनापरवाना लोखंडी कोयता बाळगताना आढळून आले. धाराशिव शहर पोलिसांच्या पथकाने संबंधितांकडील कोयता जप्त केला. याप्रकरणी धाराशिव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# विकासकामांच्या पार्श्वभूमीवर आई तुळजाभवानी मंदिरातील प्रवेश व्यवस्थेत बदल

### आजपासून भाविकांसाठी नवे प्रवेश मार्ग लागू...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ जून -**

श्री तुळजाभवानी मंदिर परिसरात सुरू असलेल्या विविध विकासकामांच्या अनुषंगाने तसेच भाविकांचे दर्शन अधिक सुलभ, सुरक्षित आणि सुरळीत व्हावे यासाठी मंदिरातील प्रवेश व्यवस्थेमध्ये महत्त्वपूर्ण बदल करण्यात आला आहे. सुधारित प्रवेश व्यवस्था दिनांक ३ जून २०२६ रोजी पहाटे ४ वाजल्यापासून लागू करण्यात येणार आहे.

श्री तुळजाभवानी मंदिर या राज्य संरक्षित स्मारकाच्या जतन व संवर्धनाच्या कामास १ जून २०२६ पासून प्रारंभ झाला असून, मंदिर परिसरात विविध विकासकामेही वेगाने सुरू आहेत.



या कामांमुळे भाविकांना कोणतीही अडचण निर्माण होऊ नये आणि दर्शन व्यवस्था सुरळीत राहावी यासाठी संस्थान प्रशासनाने नवीन प्रवेश मार्ग निश्चित केले आहेत. सिंहासन पूजा पासधारक व ५०० देणगी दर्शन पासधारक भाविकांना राजे शहाजी महाद्वार मार्गे प्रवेश देण्यात येईल, अभिषेक पूजा पासधारक, २०० देणगी दर्शन पासधारक तसेच धर्मदर्शन व म ुखदर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना बिडकर पायऱ्या मार्गे प्रवेश देण्यात येईल.

मंदिरातील सर्व महंत, पुजारी, सेवेकरी तसेच भाविक भक्तांनी या बदलाची नोंद घेऊन संस्थान प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी उपेंद्र तामोरे यांनी केले आहे.

विकासकामे आणि संवर्धनाच्या उपक्रमांमुळे भविष्यात भाविकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होणार असून, या कालावधीत प्रशासनाने केलेल्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

## तेरणा अभियांत्रिकीत ५ जून रोजी सीईटी प्रवेश प्रक्रियेबाबत मार्गदर्शन कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ जून -**

अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया लवकरच सुरू होत असून, विद्यार्थ्यांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (कॅप) संदर्भात मार्गदर्शन करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सामायिक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्ष, मुंबई यांच्या वतीने विशेष विभागीय सुसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम शुक्रवार, दि. ५ जून २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत तेरणा अभियांत्रिकी म हाविद्यालय, धाराशिव येथे होणार आहे.

सीईटी परीक्षा दिलेल्या आणि अभियांत्रिकीच्या विविध शाखांमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना सीईटी कक्षाच्या तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात येणार आहे. प्रवेश प्रक्रियेदरम्यान आवश्यक कागदपत्रे, अर्ज प्रक्रिया, कॅप फेऱ्या तसेच विद्यार्थी व पालकांच्या विविध शंकांचे निरसन या कार्यक्रमात केले जाणार आहे.

## बोरी धरणातील पाणी पिण्यासाठी राखीव ठेवा; नळदुर्ग-तुळजापूरच्या पाणीपुरवठ्यासाठी नगराध्यक्षांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३ जून -**

अल निनोच्या प्रभावामुळे यावर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता वर्तविण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर नळदुर्ग व तुळजापूर शहरांना पाणीपुरवठा करणाऱ्या बोरी धरणातील पाणी केवळ पिण्यासाठी राखीव ठेवावे, अशी मागणी नळदुर्गचे नगराध्यक्ष बसवराज धरणे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

नळदुर्ग आणि तुळजापूर या दोन्ही शहरांचा पाणीपुरवठा बोरी धरणावर अवलंबून आहे. या शहरांमध्ये दररोज मोठ्या प्रमाणात बाहेरील नागरिकांची ये-जा होत असल्याने प्रत्यक्ष लोकसंख्या अधिक असून पाण्याची मागणीही वाढलेली आहे.

त्यामुळे भविष्यात पाणीटंचाई निर्माण होऊ नये यासाठी धरणातील पाण्याचा इतर कारणांसाठी होणारा उपसा तात्काळ थांबविण्याची आवश्यकता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

नळदुर्ग नगरपालिकेने यापूर्वीही बोरी धरणातील पाणी पिण्यासाठी राखीव ठेवण्याबाबत प्रशासनाकडे मागणी केली होती. आगामी काळात नळदुर्ग आणि तुळजापूर शहरातील नागरिकांना पाण्याचा तुटवडा जाणवू नये, यासाठी धरणातील उपलब्ध पाणीसाठा केवळ पिण्याच्या वापरासाठी राखून ठेवावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

दि. २ जून रोजी जिल्हाधिकाऱ्यांना हे निवेदन सादर करण्यात आले.

यावेळी नळदुर्गचे नगराध्यक्ष बसवराज धरणे यांच्यासमवेत तुळजापूरचे नगराध्यक्ष विनोद गंगणे उपस्थित होते.

## धाराशिव शहरामध्ये घरफोडी

**धाराशिव, दि.३ जून -**

शहरातील एकमिनार मशिदीसमोरील परिसरात अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून मोबाईल व रोख रक्कम असा एकूण ३२ हजार ६९९ रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पद्मिनी जितेंद्र पेटे (वय ४०, रा. एकमिनार मशिदीसमोर, धाराशिव) यांच्या घरात १ जून रोजी रात्री १० ते २ जून रोजी पहाटे ५ वाजण्याच्या दरम्यान अज्ञात व्यक्तीने प्रवेश करून ओप्पो कंपनीचा मोबाईल व ५,७०० रुपयांची रोख रक्कम चोरून नेली.

## तुळजापूर तालुक्यातील ५३ ग्रा.पं.च्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.३ जून -**

तुळजापूर तालुक्यातील सन २०२४-२५ मध्ये मुदत संपलेल्या तसेच २०२६ मध्ये मुदत संपणाऱ्या आणि नव्याने स्थापन झालेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी सदस्य पदांच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. तुळजापूर तहसीलदारांनी जारी केलेल्या अधिकृत पत्रानुसार तालुक्यातील ५३ ग्रामपंचायतींसाठी १० जून ते १२ जून २०२६ या कालावधीत आरक्षण सोडत पार पडणार आहे.

आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर होताच ग्रामीण भागातील राजकीय हालचालींना वेग येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. गावपातळीवरील सत्ताकारणाचे केंद्र मानल्या जाणाऱ्या ग्रामपंचायतींवर वर्चस्व मिळविण्यासाठी विविध राजकीय पक्ष आणि स्थानिक गटांकडून आतापासूनच मोर्चेबांधणी सुरू होणार असल्याचे चित्र आहे.

प्रभागनिहाय आरक्षण जाहीर झाल्यानंतर संभाव्य उमेदवारांची चाचपणी, पॅनल निर्मिती, म तदारांशी संपर्क आणि निवडणूक रणनीती आखण्यास सुरुवात होणार आहे. आगामी एक-दोन म हिन्यांत निवडणुकीची प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता असल्याने सर्वच राजकीय पक्ष आणि स्थानिक नेते तयारीला लागणार आहेत.

बदलत्या राजकीय परिस्थितीत युवा नेतृत्वाला संधी देण्याची मागणीही वाढत असून अनेक गावांतील तरुण कार्यकर्ते उम `दवारीसाठी प्रयत्नशील असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे उम `दवारी निश्चित करण्यासाठी पॅनल

### १० ते १२ जूनदरम्यान सोडत; गावागावातील राजकीय वातावरण तापण्याची चिन्हे

प्रमुख आणि स्थानिक नेत्यांकडे इच्छुकांची गर्दी वाढण्याची शक्यता आहे.

पावसाळ्याच्या तोंडावर वातावरण थंड असले तरी गावागावातील राजकीय वातावरण मात्र चांगलेच तापण्याची चिन्हे दिसत आहेत. आगामी काळात कोणते पक्ष एकत्र येतात, कोणत्या गावात कोणते समीकरण जुळते, तसेच खासदार व आमदार या निवडणुकांमध्ये कितपत सक्रिय भूमिका बजावतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

तालुक्यातील या ग्राम पंचायत निवडणुकांमुळे ग्रामीण राजकारणाला नवी दिशा मिळणार का, याची उत्सुकता आता वाढली आहे.

# शिवभक्त राहुल डोके यांची रायगडवारी अखंड सुरू

### ▶▶ सलग १६ वर्षांपासून शिवराज्याभिषेक सोहळ्याचे साक्षीदार... ▶▶ शिवभक्तीचा प्रेरणादायी प्रवास...



### १६ वर्षांची अखंड शिववारी

**✱ सलग १६ वर्षांपासून रायगडावर उपस्थिती. ✱ अपघात, अडचणी आणि संकटांवर मात. ✱ कोरोनाकाळात पारगावातच शिवराज्याभिषेक साजरा. ✱ शिवचरित्र आणि शिवभक्तीचा सातत्याने प्रचार. ✱ युवकांसाठी प्रेरणादायी ठरलेला प्रवास.**

**सुधीर घोलप**
**वाशी, दि.३ जून -**

छत्रपती शिवाजी महाराजांवरील नितांत श्रद्धा, शिवचरित्राचा अभ्यास आणि शिवराज्याभिषेक सोहळ्याविषयीची अपार ओढ यामुळे वाशी तालुक्यातील पारगाव येथील शिवभक्त राहुल अच्युतराव डोके गेल्या तब्बल १६ वर्षांपासून दरवर्षी ६ जून रोजी दुर्गराज रायगडावर जाऊन शिवराज्याभिषेक सोहळ्याचे साक्षीदार होत आहेत. अनेक संकटे, अडचणी आणि बदलत्या परिस्थितीवर मात करत त्यांनी ही परंपरा अखंडपणे जपली आहे.

या सोळा वर्षांच्या प्रवासात अनेक सहकारी बदलले, नवे मित्र जोडले गेले, मात्र छत्रपती शिवाजी महाराजांप्रती असलेली निष्ठा आणि रायगडावरील शिवराज्याभिषेक सोहळ्यात सहभागी होण्याची परंपरा कायम राहिली. त्यामुळे राहुल डोके यांची ही शिववारी परिसरातील युवकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

रायगड प्रवासादरम्यान काही वर्षांपूर्वी त्यांना आणि त्यांच्या सहकाऱ्यांना गंभीर अपघाताचा सामना करावा लागला होता. अपघात अत्यंत भीषण स्वरूपाचा असतानाही शिवकृपेने कोणतीही जीवितहानी झाली नाही.



या घटनेची माहिती मिळताच शिवराज्याभिषेक सोहळ्याचे प्रमुख आणि प्रख्यात शिवव्याख्याते प्रा. यशवंत गोसावी यांनी राहुल डोके व त्यांच्या सहकाऱ्यांची आस्थेने चौकशी करून आवश्यक मदत केली होती. या प्रसंगानंतरही न खचता त्यांनी रायगडवारी अधिक जोमाने सुरू ठेवली. कोरोना महामारीच्या काळात देशभर निर्बंध लागू झाल्याने रायगडावर जाणे शक्य झाले नव्हते. मात्र अशा परिस्थितीतही राहुल डोके यांनी पारगाव येथेच शिवराज्याभिषेक सोहळा साजरा करून शिवभक्तीची परंपरा जिवंत ठेवली. यावर्षीच्या शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी राहुल डोके हे आपल्या सहकाऱ्यांसह ४ जून रोजी रात्री ८ वाजता पारगाव येथून दुर्गराज रायगडकडे प्रस्थान करणार आहेत.

पहिल्या वर्षापासून साथ देणारे मित्र, सहकारी आणि शिवभक्त यांच्या पाठबळामुळेच हा १६ वर्षांचा प्रवास शक्य झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

शिवराज्याभिषेकाचा ऐतिहासिक आणि प्रेरणादायी सोहळा अनुभवण्यासाठी जास्तीत जास्त शिवभक्तांनी रायगडावर उपस्थित राहावे, असे आवाहन राहुल अच्युतराव डोके यांनी केले आहे.

राहुल डोके यांची शिवराज्याभिषेक वारी ही केवळ प्रवासाची परंपरा नसून छत्रपती शिवाजी महाराजांप्रती असलेल्या अखंड श्रद्धा, निष्ठा आणि प्रेरणेचे जिवंत उदाहरण बनली आहे.

